(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठीत अनुवाद)

[२०२४] ३ एस.सी.आर. १०१४-१०२२ आय. एन. एस. सी. २३२

सोमनाथ

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य व इतर

(**फौजदारी अपील क्र. १७१७/२०२४**)

१८ मार्च २०२४

[न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमनुल्लाह]

विचारार्थ मुद्दा

पोलिस कोठडीत व्यक्तीवर अत्याचार करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यावर फौजदारी कारवाई करावी का?

मुख्य नोंदी

भारतीय राज्यघटना – अनुच्छेद १४२, २२६ – पोलिस कोठडीत अर्जदारावर शाब्दिक आणि शारीरिक अत्याचार - जामीन मिळूनही ४ तास बेकायदेशीररित्या अर्जदाराला ताब्यात घेतले - उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या चौकशी अहवालात उत्तरवादी क्र. २ जबाबदार आढळले - विशेष पोलीस महानिरीक्षकांनी विभागीय कारवाईत "कडक इशारा" देण्याची शिक्षा ठोठावली - उच्च न्यायालयाने

याचिकाकर्त्याची रिट याचिका अंशत: मंजूर केली परंतु फौजदारी कारवाई सुरू करण्यास नकार दिला - उत्तरवादी क्र. २ ला स्वत:च्या खिशातून ७५,०००/- रुपये भरण्याचे निर्देश देण्यात आले - उत्तरवादी क्र. २ ने रु. १,७५,०००/- आणि अधिक रु. २५०००/- भरले - उत्तरवादी क्र. २ सेवानिवृत्त झाले.

असा निर्णय दिला की: उत्तरवादी क्र. २ ने अपीलकर्त्याविरुद्ध अत्याचार केले - सुप्रीम कोर्टाने असाधारण तथ्यांवर फौजदारी कारवाई सुरू करण्यापासून परावृत्त केले - अनुच्छेद २२६ अन्वये उच्च न्यायालयाला नुकसान भरपाई देण्याबाबतचे आदेश पारित करण्याचा अधिकार आहे - न्यायालयांनी शून्य सहनशीलता दृष्टिकोन घ्यावा - पोलिस दल आणि तत्सम यंत्रणांना अटक आणि पोलिस कोठडीसंदर्भातील सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे निर्देश. [परिच्छेद २१-२४]

केस लॉ उद्धृत

दिल्ली न्यायिक सेवा संघ वि. गुजराथ सरकार [१९९१] ३ एससीआर ९३६: (१९९१) ४ एससीसी ४०६; सुनील गुप्त वि. मध्य प्रदेश सरकार [१९९०] २ एससीआर ८७१:(१९९०) ३ एससीसी ११९: प्रेम शंकर शुक्ला वि. दिल्ली प्रशासन [१९८०] ३ एससीआर ८५५:(१९८०) ३ एससीसी ५२६; भीमसिंग, आमदार वि. जम्मू आणि काश्मीर सरकार (१९८५) ४ एससीसी ६७७; डी. के. बसू वि. पश्चिम बंगाल सरकार [१९९६] पुरवणी १० एससीआर २८४:(१९९७) १ एससीसी; सुबे सिंग वि. हरयाणा ४

सरकार [२००६] २ एससीआर ६७:(२००६) ३ एससीसी १७८– अवलंबून आहे.

नीलावती बेहरा वि. ओरिसा सरकार [१९९३] २ एससीआर ५८१ : (१९९३) २ एससीसी ७४६ – संदर्भित.

अधिनियमांची यादी

भारतीय दंड संहिता, १८६०; अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९; महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१.

महत्वाचे शब्द

वैयक्तिक प्रतिष्ठा; वैयक्तिक स्वातंत्र्य; बळाचा अतिरेकी वापर; सुरक्षा, अटक; रिमांड; पोलिस कोठडी; तुरुंगातील व्यक्तीस वागणूक; कडक इशारा; विभागीय चौकशी; फौजदारी कारवाई; नुकसान भरपाई, सेवानिवृत्ती; उशीरा खटला चालविणे; पोलिस अधिकारी; शासकीय कर्तव्याचा भाग; अत्याचार करणे; मनमानी कारवाई.

त्यातून उद्भवलेले प्रकरण

फौजदारी अपीलीय अधिकारिता: फौजदारी अपील क्र. १७१७/२०२४

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद येथील मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल सीआरडब्ल्यूपी क्र. २१५/२०१७ मध्ये दिनांक ०८.१०.२०१८ पारित केलेल्या न्यायनिर्णय व आदेशावरून उद्भवलेले.

पक्षकारांची उपस्थिती

अपिलकार्त्याकरीता वकील- संदीप सुधाकर देशमुख, निशांत शर्मा, तुषार डी.भेलकर, अक्षय जगताप,

उत्तरवादीकरीता वकील- आदित्य अनिरुद्ध पांडेय, सिद्धार्थ धर्माधिकारी, भरत बागला, सौरव सिंह, आदित्य कृष्णा, अतुल बाबासाहेब डख, बिटू कुमार सिंह, प्रवीण पांडेय.

मा. सर्वोच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय/आदेश

<u>न्यायनिर्णय</u>

न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह.

अनुमती दिली.

२. पक्षकारांच्या वकिलांची बाजू ऐकली.

३. सध्याचे अपील हे फौजदारी रिट याचिका क्र. २१५/२०१७ मध्ये मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद येथील खंडपीठाने (पुढे "उच्च न्यायालय" म्हणून संबोधले जाते) दिलेल्या ०८.१०.२०१८ रोजी पारित केलेल्या अंतिम न्यायनिर्णय आणि आदेशाविरुद्ध (पुढे "आक्षेपित न्यायनिर्णय" म्हणून संबोधले जाते) निर्देशित केले आहे. ज्याद्वारे अपीलकर्त्याने दाखल केलेली रिट याचिका अंशतः मंजूर करण्यात आली आणि उत्तरवादी क्र. २ ला रु.७५,०००/- (केवळ पंचाहत्तर हजार रुपये) रक्कम स्वतःच्या

खिशातून भरून अपीलकर्त्याला देण्याचे निर्देश देण्यात आले.

<u>संक्षिप्त तथ्ये</u>:-

४. मधुकर विक्रम गायके यांनी १४.०६.२०१५ रोजी पैठण पोलीस स्टेशन, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद, महाराष्ट्र राज्य (पुढे "पीएस" म्हणून संबोधले जाते) येथे भारतीय दंड संहिता, १८६० (त्यानंतर "भा. दं. वि." म्हणून ओळखला जातो) च्या कलम ३७९[1] अन्वये दंडनीय गुन्ह्यासाठी गुन्हा क्र. १-११७-२०१५ अन्वये प्रथम खबरी अहवाल[2] दाखल केला होता ज्या मध्ये असा आरोप केला गेला की पवित्र नाथ मंदिरात रांगेमध्ये उभे असताना काही अज्ञात व्यक्तींनी खिशात ठेवलेले रु.३०,०००/- (फक्त तीस हजार रुपये) चोरून नेले, जे मंदिरातून बाहेर आल्यानंतरच त्यांच्या लक्षात आले. या गुन्ह्यात अपीलकर्त्याचा सहभाग दर्शविणाऱ्या सीसीटीव्ही[3] फुटेजच्या आधारे १४.०६.२०१५ रोजी रात्री ८.३० वाजता अपीलकर्त्याला अटक करण्यात आली.

५. दि. १५/०६/२०१५ रोजी अपीलकर्त्याला दुपारी ४ वाजता दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले असता तपास यंत्रणेने अपीलकर्त्याकडून तपासणी करण्याच्या कारणास्तव पोलिस कोठडीची मागणी केली. ही विनंती दंडाधिकाऱ्यांनी मान्य केली आणि त्याला दि. १८/०६/२०१५ पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

---

1 एफआयआर

2 ३७९. चोरीसाठी शिक्षा—जो कोणी चोरी करेल त्याला तीन वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.'

3 क्लोज सर्किट टेलिव्हिजन.

६. दि. १७/०६.२०१५ रोजी तपास यंत्रणेने भारतीय पुरावा अधिनियम १८७२ च्या कलम २७ अन्वये अर्जदाराच्या घरातून रु. ३०,०००/- (रु. तीस हजार) जप्त केल्याचे निवेदन (मेमोरंडम) तयार केले.

७. दि. १८.०६.२०१५ रोजी तपास यंत्रणेने अपीलकर्त्याला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले आणि दोन दिवसांची पोलिस कोठडी वाढवून देण्याची विनंती केली आणि ती २०.०६.२०१५ पर्यंत मंजूर करण्यात आली. दि. १९.०६.२०१५ रोजी उत्तरवादी क्र.२, तत्कालीन पीएसचे प्रभारी निरीक्षक यांनी आरोप केल्याप्रमाणे अपीलकर्त्याला हथकडी घालून लॉकअपमधून बाहेर काढले आणि गळ्यात पादत्राणांचा हार घालून अर्धनग्न अवस्थेत फिरवले आणि उत्तरवादी क्र. २ ने त्याला जातीच्या संदर्भात शिवीगाळ केली तसेच शारीरिक छळ केला.

८. दि. २०.०६.२०१५ रोजी, तपास यंत्रणेने पोलिस कोठडीत आणखी वाढ करण्याची मागणी केली नाही आणि त्यामुळे अपीलकर्त्याला दि. ०४.०७.२०१५ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. त्याच दिवशी, अपीलकर्त्याने पैठण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला , जो अंतिम अहवाल दाखल होईपर्यंत दर दुसऱ्या दिवशी सकाळी १०.०० ते १३.०० या वेळेत पोलिस स्टेशनला भेट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात आला. उत्तरवादी क्र. २ ने त्याला सोडण्यास परवानगी न दिल्याने आणि त्याऐवजी अपीलकर्त्याला पीएसकडे नेल्यामुळे

या आदेशानुसार अपीलकर्त्याची सुटका करण्यात आली नाही.

९. अर्जदाराचे नातेवाईक राहुल राजू कांबळे यांनी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पैठण यांच्यासमोर या घटनेची साखळी सांगितली आणि याचिकाकर्त्याची सुटका करण्याचे निर्देश द्यावेत तसेच संबंधित पोलिस अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस बजावावी, अशी विनंती केली. त्यावर न्यायदंडाधिकाऱ्यांनी अभियोग पक्षाला उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले होते. तथापि, शेवटी २०.०६.२०१५ रोजी अपीलकर्त्याची सुटका करण्यात आली.

१०. पोलिस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण) यांनी याचिकाकर्ते व इतरांनी केलेल्या तक्रारीवरून उपविभागीय पोलिस अधिकारी, पैठण यांना दिनांक ०७.०७.२०१५ रोजी संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. उपविभागीय पोलिस अधिकारी, पैठण यांनी उत्तरवादी क्र. २ विरुद्ध केलेल्या तक्रारीची चौकशी केली आणि अपीलकर्ता व उत्तरवादी क्र. २ तसेच इतर पोलिस अधिकारी/कॉन्स्टेबल यांना हजर राहून जबाब सादर करण्याचे आदेश दिले. दिनांक ११.०९.२०१५ च्या आपल्या अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की, १९.०६.२०१५ रोजी उत्तरवादी क्र.२ ने अर्जदाराला लॉकअपमधून बाहेर काढून पैठण शहरातील रस्त्यांवर फिरवले आणि या परेड दरम्यान त्याला शारीरिक मारहाणदेखील करण्यात आली आणि त्यासाठी उत्तरवादी क्र. २ ला जबाबदार धरले. याचिकाकर्त्याला जामीन मंजूर करूनही उत्तरवादी क्र. २

यांनी त्याला बेकायदेशीररित्या चार तास ताब्यात घेतले होते.

११. दि. ०८.१०२०१५ आणि दि. ०९.१०.२०१५ रोजी, अपीलकर्त्याच्या बहिणीने पोलीस अधीक्षक, औरंगाबाद (ग्रामीण) आणि अध्यक्ष [पुढे अध्यक्ष म्हणून संबोधले जाईल], राष्ट्रीय मानवी हक्क आयोग (पुढे "आयोग" म्हणून संबोधले जाईल) यासह विविध प्राधिकरणांकडे तक्रार केली आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ (पुढे "एससी/एसटी कायदा" म्हणून संबोधले जाते) अंतर्गत विभागीय चौकशी आणि फौजदारी खटला सुरू करण्याची मागणी केली.

१२. दि. २५/१२/२०१५ रोजी, अपीलकर्त्यावर आयपीसीच्या कलम ३९४[4] अंतर्गत दंडनीय गुन्हा क्र. १-१९२/२०१५ च्या दुसऱ्या एफआयआर संदर्भात आरोपपत्र दाखल करण्यात आले आणि तो शहरात उपलब्ध असूनही आणि तपास यंत्रणेला सहकार्य करीत असतानाही त्याला फरार घोषित करण्याची मागणी करण्यात आली. तथापि, अपीलकर्त्याला २४.०५.२०१६ रोजी अटक करण्यात आली आणि नंतर जामिनावर सोडण्यात आले.

१३. विशेष पोलिस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी यांचा दिनांक ११.०९.२०१५ रोजीचा चौकशी अहवाल पाहिल्यानंतर व उत्तरवादी क्र. २ चे स्पष्टीकरण समाधानकारक न आढळल्याने 'कडक इशारा' देण्याची

4 ३९४. दरोडा टाकताना स्वेच्छेने इजा पोहोचवणे. दरोडा टाकताना किंवा करण्याचा प्रयत्न करताना जर एखाद्या व्यक्तीने स्वेच्छेने इजा पोहोचवली तर अशा व्यक्तीला आणि अशा दरोडा टाकण्यास किंवा करण्याचा प्रयत्न करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीस १ [जन्मठेपेची शिक्षा] किंवा दहा वर्षांपर्यंत च्या सक्तमजुरीची शिक्षा होऊ शकते आणि दंडही होऊ शकतो.'

शिक्षा ठोठावली.

१४. अर्जदाराने दि. ०२.०२.२०१७ रोजी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करून उत्तरवादी क्र. २ विरुद्ध विभागीय चौकशी आणि फौजदारी कारवाई सुरू करण्याची विनंती केली आणि नुकसान भरपाईची ही मागणी केली. उत्तरवादी क्र. २ ने स्वत:च्या खिशातून अर्जदाराला देय असलेले रु.७५,०००/- (केवळ पंचाहत्तर हजार रुपये) देऊन ही रिट याचिका अंशत: मान्य केली परंतु अनुसूचित जाती/जमाती कायद्यांतर्गत फौजदारी कारवाई सुरू करण्याचे कोणतेही निर्देश देण्यास नकार दिला.

<u>अपीलकर्त्यातर्फे युक्तिवाद:-</u>

१५. अपीलकर्त्याच्या अभ्यासू वकिलांनी असा युक्तिवाद केला की, जर अपीलकर्त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचे असे उघड उल्लंघन आणि अधिकाराचा गैरवापर केल्याबद्दल, उत्तरवादी क्र. २ ला कोणत्याही प्रभावी शिक्षेशिवाय केवळ "कठोर इशारा" देऊन सोडले गेले तर ते न्यायाची खिल्ली उडवेल. डी. के. बसू विरुद्ध पश्चिम बंगाल सरकार, (१९९७) १ एससीसी ४१६ आणि सुबे सिंग विरुद्ध हरयाणा सरकार, (२००६) ३ एससीसी १७८ या खटल्यातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्येही उत्तरवादी क्र. २ चे वर्तन कारणीभूत आहे, ज्यात कोठडीत असताना तुरुंगातील बंदीस कसे वागवावे लागेल याची मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत.

१६. उच्च न्यायालयाने उत्तरवादी क्र. २ वर फौजदारी खटला चालविण्याचे निर्देश न देण्यामागचे एक कारण म्हणजे कलम १६१[5], महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१ (पुढे "पोलीस कायदा" म्हणून संबोधले जाते) एखाद्या पोलिस अधिकाऱ्याला कोणत्याही विलंबाने खटला चालविण्यापासून संरक्षण देते, हा कालावधी सहा महिन्यांचा आहे. विशेषत: सध्याच्या खटल्यातील वस्तुस्थितीत अशी अंमलबजावणी करू नये, जेथे अपीलकर्ता दुर्बल घटकातील आहे आणि पोलिस अधिकाऱ्यावर खटला चालविण्याचा अधिकार नाही, असे म्हणणे मांडण्यात आले. उत्तरवादी क्र. २ ला कोणत्याही शिक्षेशिवाय सोडून देण्यात आले आहे कारण "कडक इशारा" कोणत्याही प्रभावी शिक्षेत रूपांतरित होत नाही जी किमान/किरकोळ शिक्षेपैकी एक आहे, तर उत्तरवादी क्र. २ च्या वर्तनामुळे त्याला मोठी शिक्षा देणे आवश्यक आहे.

---

5 वर म्हटल्याप्रमाणे कर्तव्याच्या निमित्ताने केलेल्या कृत्यांच्या बाबतीत वाद किंवा खटले: - (१) पूर्वोक्तप्रमाणे कोणत्याही कर्तव्याचे किंवा प्राधिकाराचे निमित्त दाखवून, किंवा अशा कर्तव्याचे किंवा प्राधिकाराचे अतिक्रमण करून केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे [महसूल आयुक्ताने, आयुक्ताने] दंडाधिकाऱ्याने, पोलीस अधिकाऱ्याने किंवा इतर व्यक्तीने अपराध केला आहे किंवा [अशा महसूल आयुक्ताने, आयुक्ताने], दंडाधिकाऱ्याने, पोलीस अधिकाऱ्याने किंवा इतर व्यक्तीने अन्याय केला आहे असा आरोप करण्यात आला असेल तर किंवा उक्त अपराध किंवा अन्याय घडला किंवा करण्यात आला असेल तर तो पूर्वोक्त स्वरूपाचा आहे असे न्यायालयास दिसून आले असेल अशा बाबतीतील खटला किंवा वाद ज्या कृत्याबद्दल तक्रार करण्यात आली असेल ते कृत्य घडल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यानंतर केलेल्या असल्यास तो विचारार्थ स्वीकारण्यात येणार नाही किंवा तो फेटाळण्यात येईल.

परंतु, पोलिस अधिकाऱ्याविरुद्ध असलेला असा कोणताही खटला, अपराध केल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने दाखल केला असेल तर, न्यायालयाला तो विचारार्थ स्वीकारता येईल.

(२) उपरिनिर्दिष्ट अन्यायाबद्दल नियोजित वाद दाखल करावयाचा उद्देश असलेली व्यक्ति, अन्याय केल्याचा आरोप असेल अशा व्यक्तीस, नियोजित वादाबद्दल कमीत कमी एक महिना अगोदर नोटिस देईल व ज्या अन्यायाबद्दल तक्रार केली असेल त्याबद्दलचा पूर्ण तपशील देईल व असे न केल्यास असा वाद फेटाळण्यात येईल.

(३) वादपत्रामध्ये, उत्तरवादीवर उपरोक्तप्रमाणे नोटिस बजावण्यात आली आहे हा मजकूर आणि नोटिस बजवण्याचा दिनांक देण्यात येईल, आणि तीत, उत्तरवादीने नुकसानीची प्रतिपूर्ति करण्याचे कबूल केले आहे काय आणि कबूल केलेले असल्यास, किती प्रतिपूर्ति देण्याचे कबूल केले आहे या गोष्टी नमूद करील व उक्त नोटीशीची एक परत, ती नोटिस केव्हा व कशी बजावण्यात आली याबद्दलच्या वादीच्या शेऱ्यानिशी किंवा प्रतिज्ञापत्रानीशी वादपत्राबरोबर जोडण्यात येईल.

<u>सरकारतर्फे युक्तिवाद:-</u>

१७. उत्तरवादी क्र. २ विरुद्ध विभागीय कारवाई सुरू करण्यात आली असून त्यानुसार त्याला शिक्षाही सुनावण्यात आली आहे, असा युक्तिवाद राज्य सरकारच्या वकिलांनी केला.

<u>उत्तरवादी क्र.२ तर्फे युक्तिवाद:-</u>

१८. उत्तरवादी क्र. २ च्या अभ्यासू वकिलांनी सांगितले की, ही घटना पूर्णपणे तथ्यहीन आहे आणि केवळ धमकावण्यासाठी आहे आणि पोलिसांचे मनोबल खच्ची करण्यासाठी सवयीने गुन्हेगार असलेल्या अपीलकर्त्याने खोटी तक्रार दाखल केली आहे, तीदेखील पोलिस कायद्यानुसार विहित वेळेनंतर. उत्तरवादी क्र.२ ने उच्च न्यायालयाच्या निर्देशापेक्षा व या न्यायालयाने ०७.०७.२०२३[6] रोजी दिलेल्या आदेशापेक्षा १,७५,०००/- रुपये (केवळ एक लाख रुपये) म्हणजेच रु.१,००,०००/- (फक्त एक लाख रुपये) अपीलकर्त्याला यापूर्वीच दिले आहेत. ज्या गुन्ह्यासाठी खटला सुरू झाला, तो गुन्हा केल्याचे सीसीटीव्ही फुटेजवरून सिद्ध झाल्याने तो निर्दोष असल्याचा दावा करू शकत नाही, असा युक्तिवाद करण्यात आला.

---

6 उत्तरवादी क्रमांक २ च्या अभ्यासू वकिलांनी दिलेल्या सूचनेनुसार आजपासून चार आठवड्यांच्या कालावधीत याचिकाकर्त्याला १,००,०००/- रुपये (फक्त एक लाख रुपये) इतकी नुकसान भरपाई देऊ, असे नमूद केले आहे. याचिकाकर्त्याचे अभ्यासू वकील आजपासून आठवडाभरात उत्तरवादी क्र. २ च्या अभ्यासू वकिलांना याचिकाकर्त्याचे बँक तपशील देऊ शकतात.
दि. २२.०८.२०२३ रोजी पुन्हा या प्रकरणाची सुनावणीसाठी ठेवावे.
जर या तारखेपर्यंत ही रक्कम याचिकाकर्त्याला देण्यात आली आणि पक्षकारांच्या वकिलांनी निवेदन दिले, तर पुढील तारखेला हे प्रकरण बंद करण्याचा विचार केला जाऊ शकतो. '

१९. विद्वान वकिलांनी असे सादर केले की २०.०६.२०१५ रोजी दुपारी ३ वाजता, त्याला दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले असता, अपीलकर्त्याने कोणताही गैरवर्तन केल्याचा आरोप केला नाही, त्याला हातकडी घालून अर्धनग्न अवस्थेत त्याच्या गळ्यात पादत्राणाचा हार घालून परेड करण्यात आली याबद्दल फारसे कमी बोलले गेले. जामीन मंजूर होऊनही अर्जदाराची सुटका होण्यास उशीर होत असल्याने अर्जदाराच्या नातेवाइकांनी दि. २०.०६.२०१५ रोजी दंडाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली असता, १९.०६.२०१५ रोजी अपीलकर्त्याला अर्धनग्न अवस्थेत फिरवल्याचा कोणताही उल्लेख नव्हता. शिवाय, उपविभागीय पोलिस अधिकाऱ्याच्या अहवालात अपीलकर्त्याला अर्धनग्न अवस्थेत बुटांचा हार घालून फिरवल्याचा उल्लेख नाही. अहवाल सादर करणाऱ्या तत्कालीन उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांशी उत्तरवादी क्र. २ चे संबंध ताणले गेल्याने उत्तरवादी क्र. २ विरुद्ध प्रतिकूल निष्कर्ष नोंदविण्यात आले. त्यामुळे उत्तरवादी क्र. २ ने सादर केलेले स्पष्टीकरण विशेष पोलिस महानिरीक्षकांना समाधानकारक वाटले आणि त्यामुळेच केवळ 'कडक इशाऱ्याची' शिक्षा सुनावण्यात आली. गुन्हा क्र. १-१९२/२०१५ च्या एफआयआरनुसार अपीलकर्त्याचा शोध लागला नाही आणि दि. २५.१२.२०१५ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ८२(४) अन्वये त्याला फरार घोषित करण्यात आले. दि. ०३.०२.२०१७ रोजीच अपीलकर्त्याने उच्च न्यायालयात मूळ रिट याचिका दाखल केली होती आणि उत्तरवादी

क्र. २ ने त्याला अर्धनग्न अवस्थेत पादत्रणाचा हार घालून फिरवले होते, असा युक्तिवाद करण्यात आला.

२०. पोलिस अधिनियमाच्या कलम १६१ नुसार कथित कृत्याच्या सहा महिन्यांनंतर शासकीय कर्तव्याच्या नावाखाली काम करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यावर खटला चालवता येत नाही आणि उच्च न्यायालयाने अशा खटल्यावर कोणतीही कारवाई करण्याचे निर्देश देण्यास नकार दिला आहे, असा युक्तिवाद वकिलांनी केला.

<u>विश्लेषण, तर्क आणि निष्कर्ष:-</u>

२१. खटल्याची वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेतल्यानंतर, या न्यायालयाला असे आढळले आहे की उत्तरवादी क्र. २ ने अपीलकर्त्याविरूद्ध अत्याचार केला आहे हे दर्शविण्यासाठी पुरेसे पुरावे आहेत, कारण आयोगाच्या चौकशीतदेखील ते आढळले आहे आणि उच्च न्यायालयानेही त्यावर विश्वास ठेवला आहे आणि अशा निष्कर्षात विविधता किंवा हस्तक्षेप केला गेला नाही. त्यामुळे सत्तेच्या पदावर राहून आपल्या पदाचा पूर्णपणे गैरवापर करणाऱ्या उत्तरवादी क्र. २ च्या अशा मनमानी कारवाईचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात न्यायालयाला संकोच वाटत नाही. तथापि, उत्तरवादी क्र. २ सेवानिवृत्त झाला आहे आणि सध्याच्या कार्यवाहीदरम्यान उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाव्यतिरिक्त उत्तरवादी क्र. २ ने अपीलकर्त्याला स्वतःच्या खिशातून रु.१,००,०००/- (फक्त एक लाख रुपये) दिले आहेत, जे अपीलकर्त्याने स्विकारले आहेत, हे लक्षात घेता, या प्रकरणाला

आता अखेर पूर्णविराम देण्याची आवश्यकता असल्याचे न्यायालयाला वाटते. आयोगाच्या आदेशानुसार अपीलकर्त्याला रु.२५,०००/- (फक्त पंचवीस हजार रुपये) मिळाले आहेत याची नोंद घ्यायला हवी. आम्ही एवढेच जोडतो की भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अन्वये नुकसान भरपाई देण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार निर्विवाद आहे, ज्याचा संदर्भ निलाबती बेहरा विरुद्ध ओरिसा सरकार (१९९३) २ एससीसी ७४६ येथे दिलेला आहे.

२२. त्यानुसार, उत्तरवादी क्र.२ अपीलकर्त्याला पुढील रु.१,००,०००/- (फक्त एक लाख रुपये) देण्यास उत्तरदायी आहे या दुरुस्तीसह आक्षेपित न्यायनिर्णय कायम ठेवून अपील निकाली काढले जाते. तथापि, त्या न्यायनिर्णयाचे आधीच पालन केले जात असल्याने उत्तरवादी क्र.२ कडून पुढील पावले उचलण्याची आवश्यकता नाही.

२३. एवढ्यावर थांबण्यापूर्वी, न्यायालय सूचित करेल की अशा प्रकरणांमध्ये न्यायालयांनी अत्यंत कठोर दृष्टीकोन घेणे आवश्यक आहे. अशा मनमानी कृत्यांबाबत शून्य सहिष्णुतेचा दृष्टिकोन अवलंबण्याची गरज आहे, कारण सत्ताधाऱ्यांनी सौदेबाजी न करण्याच्या स्थितीत असलेल्या सामान्य नागरिकाविरुद्ध केलेले असे कृत्य संपूर्ण न्यायव्यवस्थेला लाजिरवाणे ठरते. त्यामुळे फौजदारी कारवाई सुरू करण्याचे निर्देश देण्यासाठी आम्ही राज्यघटनेच्या कलम १४२ चा आधार घेण्याचा विचार करीत होतो, परंतु केवळ उत्तरवादी क्र.२ निवृत्त झाला आहे आणि त्याने संबंधित आक्षेपित

न्यायनिर्णयाने रु.१,७५,०००/-(रु.एक लाख पंचाहत्तर हजार) रु.७५,००० (रु. पंच्याहत्तर हजार) आणि या न्यायालयाच्या दिनांक ०७.०७.२०२३ च्या आदेशानुसार रु.१,००,०००/-(रू.एक लाख रुपये) इतकी रक्कम भरली आहे ज्याने आयोगाच्या आदेशानुसार २५,०००/- (रु. पंचवीस हजार) अगोदरच अदा केलेल्या अपीलकर्त्याला आम्ही असे निर्देश देणे टाळतो. न्याय दयेने मिळायला हवा, हे लक्षात घेऊन आम्ही मागे हटतो.

<u>ताजा कलम</u> :-

२४. आजही या न्यायालयाला डी. के. बसू (उपरोल्लिखित) मधील तत्त्वे व निर्देश पुन्हा सांगणे भाग पडते, ही खेदाची बाब आहे. डी. के. बसू (उपरोल्लिखित) यांच्यासमोर या न्यायालयाने प्रेमशंकर शुक्ला विरुद्ध दिल्ली प्रशासन (१९८०) ३ एससीसी ५२६ या खटल्यात व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे रक्षण कसे करता येईल आणि राज्य किंवा तपास यंत्रणेच्या हितांशी त्याचा समतोल कसा साधता येईल याबद्दल चिंता व्यक्त केली होती. भीमसिंग, आमदार विरुद्ध जम्मू-काश्मीर सरकार, (१९८५) ४ एससीसी ६७७ या खटल्यात या न्यायालयाने नमूद केले की पोलिस अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा सर्वाधिक आदर केला पाहिजे आणि सुनील गुप्ता विरुद्ध मध्य प्रदेश सरकार, (१९९०) ३ एससीसी ११९ मध्ये ही भावना पुन्हा व्यक्त केली. दिल्ली न्यायिक सेवा संघ विरुद्ध गुजरात सरकार, (१९९१) ४ एससीसी ४०६ या खटल्यातील

परिस्थितीमुळे या न्यायालयाने पोलिसांकडून होणाऱ्या अतिरिक्त बळाच्या वापरावर कठोर शब्दांत टीका केली. त्यानुसार, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील पोलिस दलांना तसेच अटक आणि कोठडीचे अधिकार असलेल्या सर्व यंत्रणाना सर्व घटनात्मक आणि वैधानिक संरक्षण आणि या न्यायालयाने घालून दिलेल्या अतिरिक्त मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे सामान्य निर्देश दिले जातील जेव्हा एखाद्या व्यक्तीला अटक केली जाते आणि/किंवा त्यांच्या कोठडीत पाठवले जाते.

तयार केलेल्या मुख्य नोंदी:

आयशानी नारायण, मा.सहयोगी

(पडताळणी: माधवी दिवाण, वरिष्ठ वकील)

खटल्याचा निकाल:

अपील निकाली काढण्यात आले.

****

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

****